MHGA090003222025

**कौ.हिं.मा.क्र.०५/२०२५**

**नि.क्र.०५ वरील आदेश**

**(दि.०२/०६/२०२५)**

.............................................................................................

सौ. सोनल ओमप्रकाश साखरे ..... **अर्जदार.**

वि

श्री. ओमप्रकाश सुखाराम साखरे ..... **गैरअर्जदार.**

.............................................................................................

अर्जदाराचे विधीज्ञ : श्री. के. टी. सातपुते.

गैरअर्जदाराचे विधीज्ञ : श्री .एन.एन. अधिकारी

.............................................................................................

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने मौजा गणेश नगर चामोर्शी येथील मालमत्ता क्रंमाक २४९ येथे गैरअर्जदार यांने येवु नये व अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक, आर्थिक छळ करू नये असा अंतरिम संरक्षण आदेश होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार हिचे कथन असे आहे की, गैरअर्जदार हा अर्जदार हिला घरी येवुन नेहमी अश्लील शब्दात शिवीगाळ करतो तसेच मारहाण करतो. गैरअर्जदार हा अर्जदार हिला शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रास देतो. म्हणुन अर्जदार हिला अर्जात मागणी केल्याप्रमाणे संरक्षण आदेश मिळावा.

२. गैरअर्जदार यांने खुलासा दाखल केला की, सदर मालमत्तेच्या खरेदीमध्ये गैरअर्जदाराने खर्च केलेला आहे. सदर मालमत्तेमध्ये गैरअर्जदाराचे महत्वाचे दस्ताऐवज आहेत. गैरअर्जदार यांने अर्जदार हिला दारू पिवुन कधीही मारहाण, शिवीगाळ केली नाही. अर्जदार हिचे कथन खोटे आहे. म्हणुन अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अर्ज व खुलासा विचारात घेतला. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारातर्फे दाखल शपथपत्र व दस्ताऐवज पाहिले. अर्जदारातर्फे दाखल शपथपत्र व अदखलपात्र गुन्हयाच्या खबर वरून असे प्रथम दर्शनी दिसते की, गैरअर्जदार हा अर्जदार हिला शिवीगाळ, मारहाण करून कौटुंबिक हिंसाचार करत आहे. सबब पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांने मौजा गणेश नगर, चामोर्शी येथील मालमत्ता क्रंमाक २४९ येथे जावुन अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक, आर्थिक छळ करू नये असा अंतरिम संरक्षण आदेश प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निकाला पावेतो करण्यात येतो.

३. आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

४. आदेशाची नक्कल अर्जदाराला व गैरअर्जदाराला मोफत पुरविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2025.06.02 17:30:49 +0530

दिनांक : ०२/०६/२०२५

(वाय. जे. वळवी),
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.